स्नेहा सिक्युरीटी सर्विसेस, वर्धा रोड , नागपूर यांचे सामान्य रूग्णालय, गोंदिया अधिनस्त ग्रामीण रूग्णालय, सौंदड करीता पुरविलेल्या कंत्राटी वस्त्रधुलाई सेवा प्रलंबित देयक अदा करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः संकीर्ण २०१८/प्र.क्र. ६०/ आरोग्य -३

ए विंग़ , १० वा मजला, गो.ते. रूग्णालय संकूल इमारत
लो.टि. मार्ग , मुंबई- ४०० ००१
तारीख: ३१ मार्च, २०१८

वाचा -

1. **वित्त विभाग शासन निर्णय क्रमांकः विअप्र-२०१३/ प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि. १७ एप्रिल, २०१५**
2. **सहसंचालक, आरोग्य सेवा, रूग्णालये (राज्यस्तर) यांचे क्रमांकः आसे/कक्ष-३/टे-५/कं.व.धु.से./जि.श.चि. गोादिया /३४२२४-२५, दि.०५ ऑक्टोबर, २०१० चे पत्र**

प्रस्तावना -

सामान्य रूग्णालय गोंदिया करीता स्नेहा सिक्युरीटी सर्विसेस, वर्धा रोड , नागपूर या संस्थेने माहे नोव्हंबर, २०१४ ते सप्टेंअर २०१५ पर्यंत कंत्राटी वस्त्रधुलाई सेवा पुरविली होती. सदर सेवेच्या उक्त कालावधीचे कंत्राटी वस्त्रधुलाई सेवा देयकांना एक वर्षाहून अधिक कालावधीकरीता प्रलंबित असून त्यास मंजूरी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासन पुढीलप्रमाणे निर्णय घेत आहे.

शासन निर्णय-

स्नेहा सिक्युरीटी सर्विसेस, वर्धा रोड , नागपूर या संस्थेने सामान्य रूग्णालय, गोंदिया अधिनस्त ग्रामीण रूग्णालय सौंदड या रूग्णालयास पुरविलेल्या कंत्राटी वस्त्रधुलाई सेवेचे माहे नोव्हेंबर, २०१४ ते माहे सप्टेंबर, २०१५ या कालावधीकरीता रू. १०,४३२ /- (अक्षरी रू. दहा हजार चारशे बत्तीस फ़क्त) इतक्या रकमेचे देयक अदा करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर देयकावरील खर्च सन २०१७-१८ या वित्तीय वर्षाकरीता मंजूर अनुदानातून मागणी क्र. - आर-१, मुख्य लेखाशिर्ष २२१०- वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०६- सार्वजनिक आरोग्य, ११०- रूग्णालये व दवाखाने, (०१) (०१) मुसफ़ल क्षेत्रातील अध्यापनेत्तर रूग्णालये व दवाखाने (२२१० ०१४६) १०- कंत्राटी सेवा याखाली खर्ची करावा.

३. सदर बाबीसाठी प्रशासकीय अधिकारी, सामान्य रुग्णालय, गोंदिया यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच सदर रक्कम अदा करण्यास उपसंचालक, आरोग्य सेवा, नागपूर मंडळ, नागपूर यांना नियंत्रक अधिकारी म्हणून प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय, वित्त विभाग,क्रमांक विअप्र-२०१३/ प्र.क्र.३०/२०१३/विनियम, भाग-२, दि.१७.०४.२०१५ वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८, भाग- पहिला, उपविभाग - एक, अ.क्र.६, नियम क्रमांक - ४० अन्वये प्रशासकीय विभागाला प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार त्यात नमूद अटींच्या अधिन राहून निर्गमीत करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३३११३५९१६५९१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Roshani Dinesh Kadam Patil

Digitally signed by Roshani Dinesh Kadam Patil
DN: CN = Roshani Dinesh Kadam Patil, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Public Health Department
Date: 2018.03.31 15:22:30 +05'30'

रो.दि. कदम-पाटील
महाराष्ट्र शासनाच्या अवर सचिव

प्रत,

१. आयुक्त (आरोग्य सेवा) तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई .
२. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा) (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई नागपूर
३. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई

४. निवासी लेखाधिकारी, मुंबई
५. उपसंचालक, आरोग्य सेवा,नागपूर मंडळ, नागपूर.
६. जिल्हा शल्य चिकित्सक , सामान्य रूग्णालय, गोंदिया
७. वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रूग्णालय, सौंदड गोंदिया.
८. कोषागार अधिकारी, गोंदिया .
९. प्रशासकीय अधिकारी, गोंदिया
१०.स्नेहा सिक्युरीटी सर्विसेस, वर्धा रोड , नागपूर
११.वित्त विभाग (व्यय-१३), मंत्रालय, मुंबई.
१२. कार्यासन अधिकारी (अर्थसंकल्प), सा.आ.वि. मंत्रालय,मुंबई.
१३. निवडनस्ती (आरोग्य-३)